Exh-A

(12)

उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे यांचे कार्यालय,
सहकार वैभव, प्लॉट नं. ई/३, मार्केटिंग फेडरेशन इमारत, पहिला मजला,
हमाल भवन जवळ, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे- ४११ ०३७
दूरध्वनी क्र. : ०२०-२४२११११३ ई-मेल :- dyrcity४@gmail.com

जा.क्र.उनि(४)/गृह/पत्रव्यवहार अर्जदार १/ क ७५(५) व ८२(४) अन्वये/ पुणे ८ / सन २०२५ दिनांक :-)८ /०८/२०२५

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(५) व कलम ८२(४) अन्वये आदेश

श्री. लिंगेश्वर राम लोणारे व इतर ७ सभासद,
सर्व रा. मॅजेस्टीक अॅक्वा फेज-१ सहकारी गृहरचना संस्था मर्या.,
फुरसुंगी, पुणे ४१२ ३०८ ... अर्जदार

विरुध्द

चेअरमन / सेक्रेटरी,
मॅजेस्टीक अॅक्वा फेज-१ सहकारी गृहरचना संस्था मर्या.,
फुरसुंगी, पुणे ४१२ ३०८ ... जाबदेणार

वाचले:- १. श्री.लिंगेश्वर राम लोणारे व इतर यांचा दिनांक १८/०८/२०२५ रोजीचा कलम ७५(५)अन्वये अर्ज
२. या कार्यालयाकडील दिनांक ०९/०९/२०२५ रोजीची सुनावणी नोटीस
३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(५) व कलम ८२(४) मधील तरतुद

प्रस्तावना :-

ज्याअर्थी, मॅजेस्टीक अॅक्वा फेज-१ सहकारी गृहरचना संस्था मर्या.,फुरसुंगी, पुणे ४१२ ३०८ *(यापुढे जाबदेणार संस्था असे संबोधण्यात येईल)* ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९(१) अन्वये नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था असून जाबदेणार संस्थेस सदर अधिनियमातील तरतुदी लागू असून, त्या बंधनकारक आहेत. आणि,

ज्याअर्थी, वाचले क्र.१ नुसार लिंगेश्वर राम लोणारे व इतर ७ सभासद (यापुढे अर्जदार असे संबोधण्यात येईल) यांनी जाबदेणार संस्थेच्या समितीने आर्थिक वर्ष २०१२-२२ व २०२२-२०२४ या कालावधीचे लेखापरिक्षण करुन अहवाल सादर केलेला नाही. तसेच सदस्यांना आधिक पारदर्शकतेपासून वंचित ठेवले आहे. समितीने मागील लेखापरिक्षणावरील निरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल सादर केलेला नाही. आर्थिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२४ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा निर्धारित वेळेत घेतलेल्या नाहीत हे कलम ७५ चे उल्लंघन आहे. सदस्यानी वारंवार लेखी व मौखिक विनंत्या करुनही समितीने कोणतीही सुधारात्मक पावले उचललेली नाहीत. ही सततची उल्लंघनेअसुन कलम ७५(५), ७८, ७८अ व ८२ अंतर्गत कारवाईस पात्र आहेत, तरी अर्जदार यांनी सदर व्यवस्थापन समिती बरखास्त करणे, संस्थेच्या कामकाजासाठी संस्थेच्या सभासदांमधुन त्रिसदस्यीय प्रशासकीय समिती नेमावी, प्रलंबित लेखापरिक्षण पूर्ण करून त्रुटी दुरुस्तों अहवाल सादर करणे व प्रलंबित वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावणे बाबत मागणी केली आहे.आणि,

ज्याअर्थी, वाचले क्र.२ च्या नोटीशीद्वारे अर्जदार यांचे अर्जातील मागणी नुसार संस्थेचे पदाधिकारी व समिती सदस्य यांना कलम ७५(५) व कलम ८२(४) मधील तरतुदीनुसार यांना अपात्र घोषित करून त्यांचे समिती सदस्यत्व रद्द का करण्यात येऊ नये? याबाबत संस्थेचे पदाधिकारी व समिती सदस्य यांनी लेखी व तोंडी म्हणणे मांडणेकामी दिनांक ०१/१०/२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर

सुनावणीस अर्जदार श्री. अभेय दिगंबर कांबळे व अ‍ॅड. ओंकार मंगेश हजर होते व जाबदेणार संस्थेच्या यांचेवतीने अ‍ॅड. हिंगे हजर होते. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक १६/१०/२०२५, ०६/११/२०२५, २०/११/२०२५, ०४/१२/२०२५, १७/१२/२०२५, ०१/०१/२०२६, २२/०१/२०२६ व दिनांक ०५/०२/२०२६ रोजी अंतिम सुनावणी घेण्यात आली. दोन्ही पक्षकारांनी लेखी म्हणणे/युक्तीवाद सादर केल्यानंतर नस्ती निर्णयास्तव बंद करण्यात आली. आणि,

अर्जदार यांचे लेखी म्हणणे

१. **लेखा तपासणी न करणे (कलम ८१ चे उल्लंघन):** कलम ८१(१) नुसार: "प्रत्येक संस्थेची खाती दरवर्षी एकदा, शासनाने मान्यता दिलेल्या पॅनेलवरील लेखापरीक्षकामार्फत तपासली जाणे आवश्यक आहे..." समितीने आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ यांची लेखापरीक्षणे करून अहवाल सादर केलेला नाही. हा कायदेशीर बंधनाचा थेट भंग असून सदस्यांना आर्थिक पारदर्शकतेपासून वंचित ठेवले आहे. याबाबत आपल्या कार्यालयातून माहिती अधिकारांतर्गत मागावलेल्या माहिती मधून स्पष्ट होते की अधिनियमच्या तरतुदीनुसार आवश्यक असले नुसार लेखापरीक्षण अहवाल आपल्या कार्यालयात सादर केलेला नाही.

२. **दोष दुरुस्ती अहवाल न सादर करणे (कलम ८२ चे उल्लंघन):** कलम ८२ नुसार: "संस्थेने लेखा निरीक्षणातील टिप्पण्यांवर केलेल्या कार्यवाहीचा वार्षिक अहवाल नमूद करून, लेखा अहवालाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत निबंधकाकडे सादर करणे आवश्यक आहे." समितीने मागील लेखापरीक्षणांवरील निरीक्षणांचा दोष दुरुस्ती अहवाल सादर केलेला नाही. याबाबत आपल्या कार्यालयातून माहिती अधिकारांतर्गत मागावलेल्या माहिती मधून स्पष्ट होत की अधिनियमच्या तरतुदीनुसार आवश्यक असले नुसार दोष दुरुस्ती अहवाल आपल्या कार्यालयात सादर केलेला नाही.

३. **वार्षिक सर्वसाधारण सभा न घेणे (कलम ७५ चे उल्लंघन):** कलम ७५ (१) नुसार: "प्रत्येक संस्थेने आर्थिक वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत सदस्यांची वार्षिक सर्वसाधारण सभा घेणे आवश्यक आहे..." समितीने आर्थिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२४ या वर्षांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा निर्धारित वेळेत घेतलेल्या नाहीत हे कलम ७५ चे उल्लंघन आहे.

४. सदस्यांनी वारंवार लेखी व मौखिक विनंत्या करूनही समितीने कोणतीही सुधारात्मक पावले उचललेली नाहीत. ही सततची उल्लंघने असून कलम ७५(५), ७८, ७८A, व ८२ अंतर्गत कारवाईस पात्र आहेत.

म्हणून आपणास विनंती आहे की:

अ. विद्यमान व्यवस्थापन समिती बरखास्त करावी.

ब. संस्थेच्या कामकाजासाठी संस्थेच्या सभासदांन मधून त्रिसदस्यीय प्रशासकीय समिती नेमावी,

क. प्रलंबित लेखापरीक्षण पूर्ण करून तूटी दुरुस्ती अहवाल सादर करण्याचे आदेश द्यावेत.

ड. प्रलंबित वार्षिक सर्वसाधारण सभा बोलवाव्यात.

जाबदेणार संस्थेचे लेखी म्हणणे

१. संस्थेच्या सभासद मंडळाना सन २०२२-२०२३ ची वार्षिक सर्वसाधारण सभा ही दिनांक २५/०९/२०२२ रोजी घेण्यात आलेली आहे व संस्थेचे सन २०२२-२०२३ रोजीचे लेखापरिक्षण सुद्धा झालेले आहे. तसेच सन २०२३-२०२४ ची वार्षिक सर्वसाधारण सभा ही १७/०९/२०२३ रोजी घेण्यात आलेली आहे व संस्थेचे सन २०२३-२०२४ रोजीचे लेखापरिक्षण सुद्धा झालेले आहे. तसेच सन २०२४-२०२५ ची वार्षिक सर्वसाधारण सभा ही दिनांक २९/०९/२०२४ रोजी घेण्यात आलेली आहे व संस्थेचे सन २०२२-२०२३ रोजीचे लेखापरिक्षण सुद्धा झालेले आहे.

त्यामुळे तक्रारदार यांनी उपस्थित केलेला मुद्दा हा खोटा व लबाडीचा आहे. फक्त आणि फक्त संस्थेच्या संचालकांना त्रास देण्याच्या उद्देशाने व संचालकांना संस्थेचे सुरळीत कामकाज न करता यावे या उद्देशाने खोटा तक्रार अर्ज केलेला आहे.

२. जाब देणार यांनी कलम ८२ अन्वये दोष दुरुस्ती अहवाल हा आपल्या कार्यालयात दाखल केलेला आहे. अर्जदार यांचे म्हणणे हे साफ खोटे व लबाडीचे आहे. जाब देणार यांनी सन २०२२-२०२३ रोजीचे लेखपरिक्षण करून आपल्या कार्यलयात त्याची प्रत सादर करण्यात आलेली आहे. तसेच सन २०२२-२०२३ चा दोषदुरीस्ती अहवाल हा आपल्या कार्यालयात सादर करण्यात आलेला आहे. जाब देणार यांनी सन २०२३-२०२४ रोजीचे लेखपरिक्षण करून आपल्या कार्यलयात त्याची प्रत सादर करण्यात आलेली आहे. तसेच सन २०२३-२०२४ चा दोषदुरीस्ती अहवाल हा आपल्या कार्यलयात सादर करण्यात आलेला आहे.

३. अर्जदार यांच्या अर्जामध्ये नमूद केलेला मजकूर हा खरा व बरोबर नाही. अर्जदार यांनी ज्या अर्जावर सभासदांच्या सह्या घेतलेल्या आहेत त्या सह्या बहुतांश सभासदांची दिशाभूल करून घेतलेल्या आहेत. बहुतांश सभासदास सह्या घेताना असे सांगण्यात आले की, संस्थेतील अंतर्गत समस्या जसे की, पार्किंग बाबत, सफाई कामगारांकडून साफसफाई करून घेण्याबाबत, सुरक्षारक्षक यांना शिस्त लावण्याबाबत असे तोंडी सांगून सह्या घेण्यात आल्या आणि मुख्य कागदांवर मजकूर हा वेगळा लिहून आपल्या कार्यलयात देण्यात आले आहे. त्यामुळे अर्जावर केलेल्या सह्या या नामंजूर करण्यात याव्यात यासाठी संस्थेस त्यांनी पत्र दिलेले आहे. अर्जदार व इतर सभासद घेवून इतर सभासदांच्या दारात जावून दबाव टाकतात व ते संचालकांच्या घरात घुसून संचालकांनी राजीनामा देण्याबाबत त्याच्यावर दबाब टाकीत आहे.

४. अर्जदार यांच्या अर्जा मध्ये नमूद केलेला मजकूर हा खरा व बरोबर नाही. अर्जदार श्री. अभय निरगुडकर हे स्वतः हंगामी कमेटीमध्ये असताना सदरील देखभाल शुल्काबाबत ठराव त्यांनीच पारित केलेला आहे. सदरील ठरावास खजिनदार श्री. नंदकिशोर नारखडे यांनी अनुमोदन केलेले आहे. परंतु श्री. नंदकिशोर नारखंडे यांनी सन २०२०-२०२१ रोजीची वार्षिक सर्वसाधारण सभा घेतली नाही म्हणून आक्षेप घेतलेला होता. तोच ठराव लोकांच्या संमतीने सन २०२२-२०२३ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेत घेवून तसाच पुढे चालू ठेवला. त्यात कोणतीही वाढ आजतागायत केलेली नाही. तरीसुद्धा अर्जदार श्री. अभय निरगुडकर यांनी संस्थेचे देखभाल शुल्क आजतागायत भरलेले नसून सौ. स्नेहा निरगुडकर यांच्या मातोश्री अर्जदार यांच्या शेजारी ई-२०९ येथे भाड्याने राहावयास आहेत. अर्जदार यांनी त्यांना सुद्धा सांगून ठेवलेले आहे की, संस्थेला देखभाल शुल्क भरू नये. अर्जदार हे संस्थेच्या इतर सभासदांस विविध whatsapp ग्रुपवर मेसेज पाठवून देखभाल शुल्क न भरण्याचे आवाहन करीत आहेत. सदर बाब हि दिनांक २९/०२/२०२४ रोजी मा. उपनिबंधक साहेबांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. त्यामुळे तक्रारदार यांनी उपस्थित केलेला मुद्दा हा खोटा व लबाडीचा आहे. फक्त आणि फक्त संस्थेच्या संचालकांना त्रास देण्याच्या उद्देशाने व संचालकांना संस्थेचे कामकाज सुरळीत न करता यावे या उद्देशाने खोटा तक्रार अर्ज केलेला आहे.

५. अर्जदार यांच्या अर्जा मध्ये नमूद केलेला मजकूर हा खरा व बरोबर नाही. संस्थेच्या रेकॉर्ड नुसार संस्थेचे चेअरमन श्री. म्हस्के व संचालक श्री. खाके यांचे आजतागायत कोणतेही देय बाकी नाही. त्यामुळे अर्जदार यांचे म्हणणे हे साफ खोटे व लबाडीचे आहे. त्यामुळे त्यांनी केलेले आरोप हे जाब देणार यांना मान्य व कबूल नाही.

६. अर्जदार यांचे अर्जात मध्ये नमूद केलेला मजकूर हा खरा व बरोबर नाही. संस्थेचे श्री. तपस्वी (फेर लेखा परिक्षक) यांनी त्याच्या अहवालात नमूद केलेल्या सर्व मुद्यास संस्थेच्या संचालकांनी मुद्देसूद खुलासा मा. उपनिबंधक, आपल्या कार्यलयात दिलेला आहे. तसेच संचालक मंडळाच्या मासिक

सचिन कोंढाळकर संचालक सन्मान तीन सभेस अनुपस्थित नाही. त्यामुळे अर्जदार यांनी केलेला आरोप हा खोटा व लबाडीचा आहे.

७. अर्जदार यांच्या अर्जा मध्ये नमूद केलेला मजकूर हा खरा व बरोबर नाही. सदर मुद्यात नमूद केलेल्या विषया संदर्भात अर्जदार हे स्वतः हंगामी कमेटी मध्ये असताना श्री. संदीप जाधव यांच्या सदनिका क्र. जी-६०३ व जी-६०४ च्याबाबत अर्जदार यांनीच देखभाल शुल्काच्या बाबत तोंडी मंजुरी दिलेली होती. तसेच संस्थेतील ज्येष्ठसदस्यीय समीती मध्ये असलेले श्री.जितेंद्र कामठे, श्री. कैलास कामठे व श्री. सचिन कामठे यांच्या सहकार्याने अर्जदार यांनी श्री. संदीप जाधव यांना तोंडी बोली केलेले होते.

८. अर्जदार यांच्या अर्जा मध्ये नमूद केलेला मजकूर हा खरा व बरोबर नाही. सदर मुद्यात नमूद केलेल्या विषया संदर्भात जाब देणार सांगू इच्छितात की, सौ. रेश्मा भिसे ह्या त्यांच्या मुलाच्या शिक्षणा निमित्ताने हडपसर-खराडी येथे तात्पुरते रहावयास गेलेल्या आहेत. सौ. रेश्मा भिसे ह्या संचालकांच्या सर्व मासिक सभेमध्ये हजर असतात व संस्थेच्या कारभारात सहभागी असतात. संस्थेने त्यांच्याकडून Non-Occupancy चार्जेस घेतलेले आहेत. त्यामुळे अर्जदार यांचे म्हणणे खोटे व लबाडीचे आहे.

९. अर्जदार यांच्या अर्जा मध्ये नमूद केलेला मजकूर हा खरा व बरोबर नाही. सध्या अस्तित्वात असलेल्या संचालकांमुळे संस्थेचा कारभार हा सुरळीतपणे चालू आहे. उलटपक्षी अर्जदार व इतर त्याचे साथीदार यांच्यामुळे संस्थेचा कारभार सुरळीतपणे चालवण्यास अडचणी येत आहेत.

१०. अर्जदार यांच्या तक्रारीमुळे संस्थेचे अतोनात नुकसान झालेले आहे व होत आहे. संस्थेच्या कामकाजाबाबत त्यांना अधिकची माहिती असल्याचा गैर फायदा घेवुन ते संस्थेस व संस्था पदाधिकारी यांना वेटीस धरत आहे.

११. अर्जदार हे संस्थेच्या ग्रुपवर संस्थेच्या पदाधिकारी यांचे विरुद्ध वदनाम कारक माहिती देत आहेत.

१२. अर्जदार यांच्या अर्जात नमूद केलेले माहिती ही खोटी व बरोबर नाही तो जाब देणार यांना मान्य व कबूल नाही.

१३. तरी अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज फेटाळण्यात यावा हि विनंती.

निरिक्षण

अर्जदार यांचा अर्ज, लेखी म्हणणे, जाबदेणार यांचे लेखी म्हणणे व अनुषंगिक कागदपत्रे व तपासणी अधिकारी यांचा तपासणी अहवाल यांचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. मॅजेस्टीक ॲक्वा फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्या., फुरसुंगी, पुणे - ४१२३०८ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९(१) अन्वये नोंदणीकृत संस्था असून ती या कार्यालयाच्या वैधानिक कार्यकक्षेत येते.

२. सदर संस्थेचे कामकाज हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनिमय १९६० व त्या खालील नियम १९६१ व संस्थेचे उपविधी मधील तरतुदीनुसार व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार करणे हे संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर बंधनकारक आहे.

३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(१) व उपविधी क्र.९४ अन्वये संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा आर्थिक वर्ष संपाल्यापासून सहा महिन्यांच्या आंत बोलविण्याची व घेण्याची जबाबदारी ही संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांची आहे. जाबदेणार संस्थेने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २५/०९/२०२२ रोजी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १७/०९/२०२३ रोजी आणि सन

२०२३-२४ या आर्थिक वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक२९/०९/२०२४ रोजी घेतल्याचे दिसून येते.

४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(५) मधील तरतुदीनुसार कलम ७५ मधील पोटकलम (१) मध्ये लिहील केलेल्या कालावधीत सर्वसाधारण बैठक बोलाविण्यात किंवा पोटकलमे (२),(२अ),(३) किंवा (४) चे पालन करण्यात कसूर करण्यात आली तर, निबंधकास आदेशाव्दारे अशी बैठक बोलाविणे किंवा पोटकलमे (२),(२अ),(३) किंवा (४) चे अनुपालन करणे, हे ज्या कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा समितीच्या सदस्याचे कर्तव्य होते व ज्याने वाजवी सबबी वाचून उपरिनिर्दिष्ट पोटकलमांपैकी कोणत्याही पोटकलमाचे अनुपालन करण्यात कसूर केली तो अधिकारी किंवा समितीचा सदस्य उक्त आदेशात निबंधक विनिर्दिष्ट करील अशा (पाच वर्षाहून अधिक नसलेल्या) कालावधीसाठी अधिकारी म्हणून किंवा समितीचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा राहण्यास अनर्ह आहे असे जाहीर करता येईल व जर तो अधिकारी संस्थेचा कर्मचारी असेल तर त्याला पाच हजार रुपयाहून अधिक नाही इतकी रक्कम दंड भरण्याविषयी फर्मावता येईल. उक्त कलमान्वये आदेश देण्यापूर्वी निबंधक संबंधीत व्यक्तीस तसेच तिच्या बाबतीत जी कार्यवाही करण्याचे योजिले असेल तिच्या विरुध्द कारण दर्शविण्यास वाजवी संधी देईल किंवा अशी संधी देण्याची व्यवस्था करील अशी तरतूद आहे.

५. उपविधीतील तरतूदीप्रमाणे वार्षीक सभेची विषय पत्रिका नमुना " एक्स " प्रमाणे तयार करणे, व वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल सभे समोर सादर करण्याची जबाबदारी सदर संस्थेचे पदाधिकारी यांची असून त्यांनी सदर जबाबदारी पार पाडण्यात कसूर केल्याचे दिसून येत आहे.

६. जाबदेणार संस्थेची सन २०२१-२२, २०२२-२३ व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा अनुक्रमे दिनांक २५.०९.२०२२, १७.०९.२०२३ आणि दिनांक २९.०९.२०२४ रोजी घेतल्याचे दिसून येत आहे. सदर सभेमध्ये मागील वर्षाचा अखेरचा दोषदुरुस्ती अहवाल सर्वसाधारण सभेपुढे व निबंधकास विहीत मुदतीत सादर केल्याचे दिसून येत नाही. तसेच जाबदेणार यांनी संस्थेच्या लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल सादर केलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केल्याचे दिसून येत नाही.

७. जाबदेणार संस्थेची सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १०/०९/२०२३ व २२/०९/२०२४ रोजीच्या सभेच्या नोटीशीचे अवलोकन केले असता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० चे कलम ७५(२) (iii) प्रमाणे शिल्लक रकमेच्या विनियोगासाठी योजना हा विषय सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर घेण्यात आलेला नाही. त्यामुळे जाबदेणार संस्थेचे तत्कालीन पदाधिकारी यांनी कलम ७५(२) (iii) चे पालन करण्यात कसूर केला आहे.

८. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० चे कलम ७५ (२) (vii) नुसार आधीच्या लेखापरिक्षणाचा दोष दुरूस्ती अहवाल सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे आवश्यक आहे. सदर संस्थेचे पदाधिकारी यांनी आधीच्या लेखापरिक्षणाचा दोष दुरूस्ती अहवाल सर्वसाधारण सभेसमोर ठेवल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे जाबदेणार संस्थेचे पदाधिकारी यांनी कलम ७५(२) (vii) चे पालन करण्यात कसूर केला आहे.

९. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० चे कलम-७५(४) मध्ये, लेखापरीक्षित ताळेबंद, लेखापरीक्षित नफा आणि तोटा यांचा हिशेब, कलम ८१ अन्वये नेमणूक केलेल्या लेखापरीक्षकाने सादर केलेला, मागील वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षा अहवाल, आधीच्या लेखापरीक्षेचा दुरुस्ती अहवाल आणि समितीचा अहवाल हे, स्वीकृतीसाठी अधिमंडळाच्या प्रत्येक वार्षिक बैठकीत

ठेवण्यात येतील आणि उपविधीमध्ये निर्धारित केल्याप्रमाणे आणि ज्यांची रीतसर नोटीस दिलेली आहे. असे इतर कामकाज करण्यात येईल. अशी तरतुद आहे. सदर तरतूदीप्रमाणे आधीच्या लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल योग्यरित्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आला असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे जाबदेणार संस्थेचे तत्कालीन पदाधिकारी यांनी कलम-७५(४) चे पालन करण्यात कसूर केला आहे.

१०. जाबदेणार संस्थेची सन २०२१-२२, २०२२-२३ आणि सन २०२३-२४ या कालावधीच्या वार्षीक सर्वसाधारण सभेच्यावेळी पदाधिकारी यांनी कलम ७५(२अ), ७५(४) आणि ८२(१) मधील तरतुदीचे पालन करून कामकाज करणे अनिवार्य होते. तथापि, जाबदेणार संस्थेचे पदाधिकारी यांनी सदर तरतूदीचे पालन करण्यात कसूर केला आहे.

११. संस्थेच्या आदर्श उपविधी क्रमांक १३९ व १४० मधील तरतुदीनुसार संस्थेच्या अध्यक्ष व सचिवांचे कायदा, कानुन व उपविधीनुसार कामकाज करणे बंधनकारक आहे. तथापि प्रस्तुत प्रकरणासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन संस्थेचे पदाधिकारी यांनी आपली कर्तव्य व जबाबदारी योग्यरित्या पार न पाडल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.आणि,

अनुमान :-

उक्त निरिक्षणे विचारात घेता जाबदेणार संस्थेच्या तत्कालीन समिती सदस्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(२अ), ७५(४), ८२ (४) मधील तरतुदीनुसार विद्यमान पदाधिकारी यांनी कर्तव्यात कसुर केल्याने संबंधीतांवर त्या अनुषंगाने कारवाई करणे न्यायोचित होईल, अशी माझी खात्री झाली आहे. आणि..

-आदेश-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(५) व ८२ (४) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, डी. एस. हौसारे, उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे. **मॅजेस्टीक ॲक्वा फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्या., फुरसुंगी, पुणे - ४१२३०८** या संस्थेचे पदाधिकारी **(१) श्री. दत्तात्रय म्हस्के (अध्यक्ष), (२) श्री. नंदकिशोर नारखडे (सचिव)** यांचे समिती सदस्यत्व रद्द करीत असून त्यांना या आदेशाच्या दिनांकापासून सदर पदावरुन कमी करीत असून सहा महिने कालावधीसाठी पदाधिकारी म्हणून किंवा समितीचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा राहण्यास अनर्ह घोषीत करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक १८/०८/२०२६ रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिला असे.

(डी. एस. हौसारे)
उपनिबंधक,
सहकारी संस्था,पुणे शहर (४) पुणे.

प्रति,

अर्जदार/जाबदेणार